सत्य • विश्वास • विकास

दैनिक
नवे क्षितिज

सत्यं ज्ञानं प्रगतिः

Title Code/No. :- MHMAR/26/A5130

● शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ ● वर्ष : १ ले ● अंक : ३४ वा ● दिग्रस (जि. यवतमाळ) ● पृष्ठे-४ ● किंमत ५ रू. ● मुख्य संपादक : सतीश मेहता

महत्त्वाचे...

महिला आरक्षण लवकरच? रिजिजूंचे विशेष अधिवेशनाचे संकेत

नवी दिल्ली : महिला आरक्षण कायदा लवकर लागू करण्याच्या हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी संसद पुन्हा बोलावण्याचे संकेत दिल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मात्र, विशेष अधिवेशनाबाबत सरकारने अद्याप स्पष्ट निर्णय जाहीर केलेला नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना महिला आरक्षण कायदा लवकर लागू करण्याचे आश्वासन दिले असून, सरकार त्याच दिशेने काम करीत असल्याचे रिजिजू यांनी स्पष्ट केले. गेल्या १३ ऑगस्टला पावसाळी अधिवेशन संपले असले तरी त्याचे अद्याप सत्रावसान झालेले नाही. या पार्श्वभूमीवर रिजिजू यांच्या वक्तव्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहून परिसीमनाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली आहे. संसदेत कोणताही प्रस्ताव मांडण्यापूर्वी राजकीय पक्षांना त्याचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

काँग्रेसच्या भूमिकेनुसार, लोकसभेच्या विद्यमान ५४३ जागा आणि राज्यांचा वाटा पुढील २५ वर्षांसाठी कायम ठेवून २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिला आरक्षण लागू करावे. तसेच परिसीमनाच्या मुद्द्यावर सर्वपक्षीय चर्चा झाल्यानंतरच पुढील निर्णय घ्यावा, असे खरगे यांनी म्हटले आहे. त्यामुळे सरकारच्या पुढील भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याला बदनाम करण्याचे कारस्थान यशस्वी होणार नाही : मुख्यमंत्री

नागरिकांना झालेल्या त्रासाबद्दल मुख्यमंत्र्यांकडून दिलगिरी

▸ नवे क्षितिज : प्रतिनिधी

नाशिक : सिंहस्थ महाकुंभमेळ्यात मोठ्या प्रमाणात प्रष्टाचार झाल्याचा आरोप करून कुंभमेळ्याला विनाकारण बदनाम करण्याचे कारस्थान काहीजण करत आहेत. मात्र, हे कारस्थान कदापि यशस्वी होणार नाही. आगामी काळात नाशिकचा बदललेला आणि विकसित चेहरा सर्वांसमोर येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ महाकुंभमेळ्याच्या निमित्ताने ठक्करबोम येथे आयोजित करण्यात आलेल्या 'भक्ती संगम' कार्यक्रमाचे उद्घाटन शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, पक्षाचे ष्टहरष्ट्र सुनील केदार, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस अधीक्षक स्वामी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सिंहस्थ कुंभमेळा हा भक्ती आणि आस्थेशी निगडित असताना देखील काहीजण विनाकारण या श्रद्धेला बदनाम करण्याचे कारस्थान करत आहेत. नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याला बदनाम करण्यासाठी प्रष्टाचाराचे आरोप केले जात आहेत. प्रशासन आणि सरकार प्रष्टाचार करत असल्याचा आरोप करून काहीजण कुंभमेळ्याची बदनामी करण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला. कुंभमेळ्याबाबत आरोप करणाऱ्यांनी 'ये पब्लिक है, सब जानती है' हे लक्षात ठेवावे, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

विकासकामांना विलंब झाल्याची कबुली

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. मात्र, युद्धजन्य परिस्थितीमुळे डांबर तसेच इतर साहित्याच्या दरात वाढ झाली. त्यामुळे कामे करताना काही अडचणींचा सामना करावा लागला आणि काही कामांना विलंब झाला. तसेच नॅचरल गॅस प्राधिकरणाकडून काही ठिकाणी चुकीच्या पद्धतीने काम झाल्यानेही विलंब झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी मान्य केले.

या विलंबामुळे नाशिककरांना त्रास सहन करावा लागला असून, त्याबद्दल सरकारने यापूर्वीच नागरिकांची माफी मागितली आहे. आजही नाशिककरांची माफी मागत असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

'विकसित नाशिक' सर्वांना चकित करेल

आगामी काळात नाशिकमध्ये होणारा विकास सर्वांना चकित करणारा असेल. 'विकसित नाशिक'चा चेहरा सर्वांसमोर आल्यानंतर नागरिकांना झालेला विकास पाहून समाधान आणि आनंद होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या कामांमुळे नागरिकांना त्रास होत असल्याची सरकारला जाणीव आहे. स्थानिक पदाधिकारी, आमदार, मंत्री तसेच महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना याबाबत कल्पना देण्यात आली आहे. सध्या नागरिकांना त्रास होत असला तरी भविष्यातील विकासकामांमुळे त्यांना समाधान मिळेल. त्यामुळे नागरिकांनी पदाधिकाऱ्यांवर रोष व्यक्त केला तरी त्यांनी त्यावर प्रतिक्रिया देऊ नये, अशा सूचना देण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या दाम्पत्याला अटक

मोहम्मद साहिल व समीरा यांच्याकडून आठ भारतीय सिमकार्ड जप्त; कॅन्टोन्मेंट परिसराची रेकी केल्याचा आरोप

▸ नवे क्षितिज : वृत्तसंस्था

नवी दिल्ली : पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित कथित हेरगिरी नेटवर्कचा दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेल्ने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात मोहम्मद साहिल आणि त्याची पत्नी समीरा या दाम्पत्याला अटक करण्यात आली आहे. दोघेही २०२४ पासून सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानी गुप्तचर एजंटांच्या संपर्कात होते आणि त्यांच्या नेटवर्कसाठी काम करत असल्याचा पोलिसांचा दावा आहे.

दिल्ली पोलिसांनी या कारवाईला 'ऑपरेशन समीरा' असे नाव दिले आहे. तपासादरम्यान साहिल आणि समीरा यांनी २०२४-२५ या कालावधीत आठ भारतीय सिमकार्ड मिळवून ती दुबईमार्गे पाकिस्तानला पाठवल्याचे समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. या सिमकार्डचा वापर पाकिस्तानातून व्हष्टिसॲप अकाउंट चालविण्यासाठी तसेच भारतीय नागरिकांशी संपर्क साधून संवेदनशील माहिती मिळविण्यासाठी करण्यात आल्याचा संशय आहे. या कामाच्या मोबदल्यात दोघांना सुमारे ३० हजार रुपये मिळाल्याचेही पोलिसांनी म्हटले आहे.

इन्स्टाग्रामवरून पाकिस्तानी एजंटच्या संपर्कात

दिल्ली-एनसीआरमध्ये कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांना कथित लॉजिस्टिक मदत करत असल्याची माहिती स्पेशल सेल्ला मिळाली होती. तपासादरम्यान आयएसआयसमर्थित कथित नेटवर्कचा धागा पोलिसांच्या हाती लागला.

पोलिसांच्या माहितीनुसार, साहिल २०२४ मध्ये इन्स्टाग्रामच्या माध्यमातून एका पाकिस्तानी एजंटच्या संपर्कात आला. त्यानंतर समीरा हिचाही या संपर्कात सहभाग झाला. पुढे दोघांचा संपर्क एका कथित पाकिस्तानी इंटेलिजन्स ऑफिसिएशी (पीआयओ) झाला. आर्थिक मोबदल्याचे आमिष दाखवून त्यांना नेटवर्कसाठी काम करण्यास प्रवृत्त केल्याचा पोलिसांचा आरोप आहे.

सिमकार्ड पाकिस्तानला पाठवल्याचा आरोप

साहिल आणि समीरा यांनी मिळवलेली आठ भारतीय सिमकार्ड दुबईमार्गे पाकिस्तानला पाठविली. या सिमकार्डवर पाकिस्तानातून व्हष्टिसॲप अकाउंट सुरू करून भारतीय नागरिकांशी संपर्क साधण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. काही भारतीय व्हष्टिसॲप ग्रुपमध्येही प्रवेश करण्यात आल्याचा संशय आहे. तपासात साहिलला कॅन्टोन्मेंट परिसराची रेकी करण्याचे आणि नेटवर्कसाठी अन्य व्यक्तींना जोडण्याचे काम देण्यात आल्याचे समोर आल्याचा पोलिसांचा दावा आहे. तसेच कोर्ट मार्शलची कारवाई सुरू असलेल्या काही लष्करी जवानांशी संबंधित माहिती त्याने कथितरीत्या शेअर केल्याचेही पोलिसांनी सांगितले.

मोबाईलच्या फॉरेन्सिक तपासातून उलगडा

साहिलच्या मोबाईल फोनच्या फॉरेन्सिक तपासात पाकिस्तानी हँडलर्ससोबत झालेल्या कथित संशयास्पद चॅट आणि संभाषणांची माहिती मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. या डिजिटल पुराव्यांच्या आधारे चौकशी केल्यानंतर समीरा हिची भूमिका समोर आली आणि तिलाही अटक करण्यात आली. समीरा नोएडातील एका कॉल सेंटरमध्ये काम करत असल्याची माहिती आहे.

या कथित हेरगिरी नेटवर्कमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, सिमकार्डचा पुरवठा कोणी केला आणि संवेदनशील माहिती नेमकी कोणापर्यंत पोहोचली, याचा तपास दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलकडून सुरू आहे.

तरुणावर फायटरने हल्ला; दोघांवर गुन्हा दाखल

पांढरकवडा : उसनवार मागितलेले पैसे देण्यास नकार दिल्याने एका तरुणावर फायटर आणि कडयाने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना पांढरकवडा शहरात घडली.

राहुल कल्राज श्रीवाते (वय २८, रा. शिवाजी वार्ड) हे ट्रेंड्स दुकानासमोरील पानठेल्यावर उभे असताना आरोपी हेमंत दीपक गोयर (वय २१) याने त्यांच्याकडे १० हजार रुपयांची उधारी मागितली. राहुल यांनी नकार दिल्याने हेमंत गोयर व त्याचा साथीदार प्रेम सुनील सदवानी (वय २४) यांनी शिवीगाळ करत फायटर व कडयाने राहुल यांच्या नाकावर, ओठावर व पाठीवर मारहाण करून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पांढरकवडा पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

४० लाखांच्या लाचप्रकरणी सीजीएसटीचे दोन अधिकारी अटकेत

रायगडमध्ये सीबीआयची कारवाई; मध्यस्थाला रंगेहाथ पकडले, ४३ लाखांची रोकड व ९० लाखांचे दागिने जप्त

▸ नवे क्षितिज : प्रतिनिधी

रायगड : महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात ४० लाख रुपयांच्या लाचप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मोठी कारवाई केली आहे. दगड खाण कंपनीशी संबंधित जीएसटी आणि रॉयल्टीचा वाद निकाली काढण्यासाठी लाच मागितल्याच्या आरोपावरून सीजीएसटीचे अतिरिक्त आयुक्त तथा आयआरएस अधिकारी विनय कुमार कन्हेटी, रायगडचे सीजीएसटी अधीक्षक राकेश कुमार सिन्हा आणि खासगी व्यक्ती नरेंद्र राजपूत यांना सीबीआयने अटक केली आहे.

सीबीआयच्या माहितीनुसार, संबंधित प्रकरण निकाली काढण्यासाठी सीजीएसटी अधीक्षक राकेश कुमार सिन्हा यांनी तक्रारदाराकडे सुरुवातीला तब्बल १ कोटी ५० लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. त्यानंतर झालेल्या चर्चेनंतर लाचेची रक्कम कमी करून ४० लाख रुपये निश्चित करण्यात आल्याचे तपासात समोर आले.

लाचेची रक्कम स्वीकारण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांनी नरेंद्र राजपूत या खासगी व्यक्तीचा मध्यस्थ म्हणून वापर केल्याचा आरोप आहे. तक्रारदाराला त्याच्यामार्फत ४० लाख रुपये देण्यास सांगण्यात आले. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर सीबीआयने सापळा रचून कारवाई केली. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारण्यासाठी नरेंद्र राजपूत आला असता सीबीआयच्या पथकाने त्याला ४० लाख रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडले. त्यानंतर केलेल्या चौकशीत या प्रकरणात सीजीएसटी अधीक्षक राकेश कुमार सिन्हा आणि अतिरिक्त आयुक्त विनय कुमार कन्हेटी यांची कथित भूमिका समोर आली. सीबीआयच्या म्हणण्यानुसार, लाचेची रक्कम स्वीकारल्याची बाब दोन्ही अधिकाऱ्यांनी मान्य केली. त्यानंतर तिघांनाही अटक करण्यात आली.

अटकेनंतर सीबीआयने आरोपींशी संबंधित विविध ठिकाणी झडती घेतली. या कारवाईत ४३ लाख रुपयांची अतिरिक्त रोकड जप्त करण्यात आली. याशिवाय सुमारे ९० लाख रुपये किमतीचे दागिनेही आढळून आले. लाचेच्या ४० लाख रुपयांव्यतिरिक्त झडतीत सापडलेली रोकड आणि दागिनेही तपासाच्या कक्षेत असून, त्यांचा स्रोत तपासला जात आहे.

दगड खाण कंपनीशी संबंधित जीएसटी आणि रॉयल्टी वादात आरोपी अधिकाऱ्यांची नेमकी भूमिका काय होती, लाचेच्या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच जप्त करण्यात आलेल्या रोकड आणि दागिन्यांचा या प्रकरणाशी काही संबंध आहे का, याचा सीबीआय तपास करीत आहे. अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना सक्षम न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.

२२८ हरविलेले मोबाईल शोधून मालकांना परत

आर्णी पोलिसांची कामगिरी; तांत्रिक तपासाच्या मदतीने कारवाई

▸ नवे क्षितिज : प्रतिनिधी

आर्णी : हरविलेले तसेच चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून काढण्याच्या मोहिमेत आर्णी पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तांत्रिक तपास आणि विविध माध्यमांच्या प्रभावी वापर करून पोलिसांनी तब्बल २२८ मोबाईल फोन शोधून काढले असून, ते संबंधित मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत.

मोबाईल फोन हरवल्यानंतर नागरिकांनी घाबरून न जाता तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. तसेच हरविलेल्या मोबाईलमधील सिमकार्ड तातडीने बंद किंवा ब्लॉक करून घ्यावे. यामुळे हरविलेल्या मोबाईलचा गैरवापर करून आर्थिक फसवणूक अथवा अन्य अनुचित प्रकार होण्याचा धोका टाळता येऊ शकतो.

सापडलेला मोबाईल पोलिसांकडे जमा करा

रस्त्यावर अथवा अन्य ठिकाणी सापडलेला किंवा संशयास्पदरीत्या मिळालेला मोबाईल स्वतःकडे ठेवू नये, तसेच असा मोबाईल खरेदी करू नये. चोरीचा किंवा हरविलेला मोबाईल वापरणे अथवा खरेदी करणे कायदेशीर अडचणीचे ठरू शकते, अशा प्रकरणात संबंधित व्यक्तीविरुद्धही कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे.

कोणास मोबाईल फोन सापडल्यास तो जवळच्या पोलीस ठाण्यात जमा करावा. आपला मोबाईल हरवल्यास विलंब न करता पोलिसांकडे तक्रार नोंदवून आवश्यक कायदेशीर व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी सतर्क राहून मोबाईलचा गैरवापर टाळावा आणि सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन आर्णी पोलीस ठाण्याचे ठाणेदार संजय खंडारे, अमोल कान्हेरकर आदींनी केले आहे.

आर्णी परिसरातून ४२ हजारांच्या बकऱ्यांची चोरी

आर्णी : आर्णी तालुक्यातील ब्राह्मणवाडा, चांदापूर व काकडदरा परिसरातून अज्ञात चोरट्यांनी ४२ हजार रुपये किमतीची पाच जनावरे (बकऱ्या व बोकड) चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. बाळू मोहन राठोड यांच्या शेडमधून दोन बकऱ्या व एक बोकड (किंमत २० हजार रुपये), अविनाश राठोड यांच्या गोठ्यातून एक बकरी (किंमत १२ हजार रुपये) आणि अरविंद राठोड यांच्या गोठ्यातून एक बोकड (किंमत १० हजार रुपये) अज्ञात चोराने लंपास केले. बाळू राठोड यांच्या तक्रारीवरून आर्णी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

पूरग्रस्त नेपाळसाठी भारताची 'एअर रिलीफ'; वायुसेनेने पोहोचवली ४७.५ टन मदत

अवघ्या काही तासांत भारताने एनडीआरएफच्या मदतीने ऑपरेशन केले सुरू

▸ नवे क्षितिज : वृत्तसंस्था

नवी दिल्ली : नेपाळमध्ये हिमनदीचा मोठा भाग तुटल्याने आलेल्या विनाशकारी पुरामुळे झालेल्या हानीचा सामना करण्यासाठी भारतीय वायुसेना मदत आणि बचाव कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आपत्तीच्या काही तासांतच वायुसेनेने सी-130जे विमानाद्वारे 10 टन आवश्यक मदत सामग्री नेपाळमध्ये पोहोचवली. यामध्ये औषधे, तात्पुरते निवारे, ब्लँकेट आणि हायजीन किट्सचा समावेश होता. दुसरी खेप घेऊन वायुसेनेच्या सी-17 ग्लोबमास्टर विमानाने 37.5 टन अतिरिक्त मदत सामग्री (अन्न पाकिटे आणि आवश्यक औषधे) घेऊन काठमांडूसाठी उड्डाण केले. भारताने आतापर्यंत एकूण 47.5 टन मदत सामग्री नेपाळला पाठवली आहे.

नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे मदत कार्यासाठी वायुसेनेने आपल्या ट्रान्सपोर्ट विमानांचा ताफा स्टँडबायवर ठेवला आहे. यामध्ये सी-17, सी-130जे आणि सी-295 विमानांचा समावेश आहे. एक सी-130जे ट्रान्सपोर्ट विमान आज उशिरापर्यंत मदत सामग्री घेऊन नेपाळसाठी उड्डाण करणार आहे. वायुसेनेची एमआय-17 हेलिकॉप्टरही नेपाळी नागरिकांच्या मदतीसाठी चोवीस तास उड्डाण करत आहेत. मदत सामग्री घेऊन नेपाळला जाणाऱ्या विमानांचे संचालन वायुसेनेच्या हिंडन स्टेशनवरून केले जात आहे.

स्टेशनचे एओसी एअर कमोडोर आर. डोभाल यांनी सांगितले की, आम्ही अशा आपत्कालीन परिस्थितीसाठी नेहमीच तयार असतो. त्यामुळे आम्ही तातडीने एक सी-130जे हरक्युलिस विमान तयार केले. त्यामध्ये आम्ही मदत सामग्री, औषधे आणि जनरेटर लोड केले. हे काम नागरी अधिकाऱ्यांच्या आणि एनडीआरएफच्या मदतीने पूर्ण करून ऑपरेशन सुरू करण्यात आले. विमानाने रात्री सुमारे 8.30 वाजता उड्डाण केले आणि दोन तासांच्या आत नेपाळमध्ये उतरून सुमारे 10 टन सामग्री पोहोचवली. याच दुसऱ्या फ्लाइटमध्ये सी-17 विमानातून पुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या नेपाळसाठी 37.5 टन मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण सामग्री, औषधे आणि खाद्यपदार्थांची पाकिटे पोहोचवण्यात आली.

त्यांनी सांगितले की, वायुसेना भारताच्या आत तसेच नेपाळ, म्यानमार आणि श्रीलंका यांसारख्या शेजारी देशांमध्ये अनेकदा मदतकार्य करते. नुकतेच व्हेनेझुएलाप्रमाणेही एक ऑपरेशन करण्यात आले होते. जगात कुठेही गरज भासल्यास मदत करण्यासाठी वायुसेना सज्ज आहे. नेपाळमध्ये आणखी मदतीची गरज भासल्यास आम्ही पूर्णपणे तयार आहोत. नेपाळमध्ये 2015 मध्ये झालेल्या भूकंपाच्या वेळी वायुसेनेचे सी-130 विमान मदत पथक आणि डॉक्टरांसह सर्वप्रथम खराब झालेल्या धावपट्टीवर उतरले होते. त्यावेळी वायुसेनेने 2200 हून अधिक उड्डाणे केली होती. नेपाळमध्ये 26 ऑगस्ट रोजी अचानक आलेल्या पुराच्या काही तासांतच वायुसेनेला स्टँडबायवर ठेवण्यात आले.

साखरेच्या कारखाना स्तरावरील दरात सुमारे २० टक्के घट

किरकोळ दर कमी व्हायला सुरुवात; सरकारी उपाययोजनांमुळे बाजारातील उपलब्धता सुधारून जलद पुरवठा सुनिश्चित झाला

▸ नवे क्षितिज : वृत्तसंस्था

नवी दिल्ली : साखरेची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि देशांतर्गत बाजारपेठेत साखरेची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी सरकारने अनेक सक्रिय उपाययोजना केल्या आहेत. अलीकडच्या काळात साखरेच्या एक्स-मिल, अर्थात कारखाना स्तरावरील दरात सुमारे 20 टक्के घट झाली असून, किरकोळ बाजारातील साखरेचे दरही कमी होऊ लागले आहेत. पुरवठा साखळीतील बदलांचा परिणाम चवता, लवकरच साखरेचे किरकोळ दरही एक्स-मिल दरांप्रमाणेच खाली येतील अशी अपेक्षा आहे.

केंद्र सरकार देशभरातील साखरेच्या किमती, साठा आणि ने-आण यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि पुरेशा उपलब्धतेचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचेल हे सुनिश्चित करण्यासाठी सरकारने अनेक सक्रिय उपाययोजना केल्या आहेत. कारखान्यातील (एक्स-मिल) आणि किरकोळ दरांमध्ये दिसून येणारा घसरणीचा कल हे दर्शवितो की, देशात साखरेचा पुरेसा साठा असूनही अलीकडच्या काळात प्रामुख्याने साठेबाजी आणि सट्टेबाजीमुळे साखरेच्या दरात वाढ झाली. प्रत्यक्ष पडताळणीद्वारे साखरेचा पुरेसा साठा असल्याची खात्री करण्यात आली

साखर कारखान्यांमधील साखरेच्या साठ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी राबवण्यात आलेल्या देशव्यापी मोहिमेमुळे साखरेची उपलब्धता समाधानकारक असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. अनेक प्रकरणांमध्ये, साखर कारखान्यांकडे असलेला साठा हा त्यांनी सरकारला सादर केलेल्या मासिक प्रवाहामधील घोषित साठ्यापेक्षा अधिक असल्याचे आढळून आले. या पडताळणी प्रक्रियेतून हे सिद्ध झाले की, देशात साखरेचा तुटवडा नाही. त्यामुळे घाबरून जाऊन साखरेची खरेदी करण्याची अथवा गरजेपेक्षा जास्त साठा करण्याची आवश्यकता नाही.